नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

# प्रेस नोट

दिनांक 20/03/2021 (शनिवार)
(दुपार)

---

## खून

पो.स्टे. भिवापुर :– अंतर्गत 25 कि. मी अंतरावर पाहमी येथे फिर्यादी नामे– अनिल नत्थुजी पिल्लेवान, वय 53 वर्ष, रा. पाहमी ता. भिवापुर जि.नागपुर यांचे भाउ नामे– पंजाब नत्थुजी पिल्लेवान यांची मुलगी मोनिका पंजाब पिल्लेवान हीचे लग्न गावातील सभा मंडपात होते. त्या लग्नाकरीता मुलाकडील 25 ते 30 लोक आलेले होते. दिनांक 21/03/2021 रोजी दुपारी 03.00 वा. सुमारास गावातील आरोपी क्र. 1) सचिन वामन डहाके, वय 30 वर्ष, रा. पाहमी हा जेवन करण्याकरीता आला असता तो नवरदेवाकडील लोकांमध्ये जेवन करीत असतांना त्याला धक्का लागला होता. याकारणावरुन त्याचा वाद झाला तेव्हा सचिन डहाके याला समाजावुन घरी पाठवीले होते. त्यानंतर साय. 05.00 वा सुमारास सचिन डहाके व त्याचा भाउ आरोपी क्र. 2) समीर वामन डहाके वय 20 वर्ष व वडील आरोपी क्र. 3) वामन गोवींदा डहाके, वय 54 वर्ष, सर्व रा. पाहमी ता. भिवापुर हे तेथे हातामध्ये लाठया–काठया घेउन आले. आरोपीतांनी वरा(नवरदेवा) कडील लोकांना मारहाण केली. त्यामध्ये अश्विन नरेश टेंभरे, प्रविन नरेश टेंभरे, दिपक चंदु राउत, आशीष बोंदरे सर्व रा. वडधामना यांना काठीने मारुन जखमी केले. जखमी झालेल्या इसमांना दवाखाण्यात घेउन जात असतांना आरोपीतांनी त्यांचे गाडयांचे काच फोडले. जखमी आश्विन नरेश टेंभरे, वय 35 वर्ष, रा.वडधामना याचा वैदयकीय उपचारा दरम्याण उमरेड येथे मृत्यु झाला. तरी यातील आरोपीतांनी जेवन करतांनी नवरदेवा कडील लोकांचा धक्का का लागला? याकारणावरुन आरोपीतांनी लाठया–काठयांनी मारहाण केली व आश्विन नरेश टेंभरे यांना जिवानिशी मारून ईतर लोकांना जखमी केले आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. भिवापुर येथे आरोपीविरुध्द कलम 302, 324, 427, 34 भादंवि. कलम 3 (2)(अ) अनुसुचित जाती/अनुसुचीत जमाती अत्याचार प्रतिबंधक अधि. 1989. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीतांना अटक करण्यात आली आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास श्री. भिमराव टेळे, उपविभागीय पोलीस अधिकारी, उमरेड विभाग उमरेड हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर